**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १२ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. केंद्रीय मंत्रिमंडळाची 'एक देश एक निवडणूक' या विधेयकाला मंजुरी.
2. रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात लागू करण्याची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती.
3. सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची आज समाप्ती; देशभरातल्या ५१ केंद्रांवर रात्री ८ वाजता घोषित होणार विजेते.
4. नागपुरात रेशीम बाग मैदान इथं 14 ते 16 डिसेंबर दरम्यान पीएम विश्वकर्मा प्रदर्शनाचं आयोजन.
5. थंडीचा जोर कायम; नागपूर आणि गोंदिया इथं विदर्भातील सर्वांत कमी किमान तापमानाची नोंद.

---

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाने आज झालेल्या बैठकीत 'एक देश एक निवडणूक' या विधेयकाला मंजुरी दिली आहे. एक देश एक निवडणूक संदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारसी मंत्रिमंडळाने स्वीकारल्या असून एकाच वेळी केंद्रीय, राज्य आणि स्थानिक स्तरावर निवडणुका घेण्यासाठी, 'एक देश एक निवडणूक' हे विधेयक संसदेच्या चालू हिवाळी अधिवेशनात मांडण्यात येणार असल्याची शक्यता आहे.

---

**संसद**

राज्यसभेत विरोधी पक्षाने दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्याला सत्ताधारी भाजपा खासदारांनी दिलेल्या प्रत्युत्तरानंतर राज्यसभेत गोंधळ झाला. या गोंधळातच अध्यक्षांनी राज्यसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकुब केलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतरही सदस्यांनी गोंधळ केल्यामुळे ते दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. सकाळच्या सत्रात भाजपा खासदार जे.पी. नड्डा यांनी कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की स्थगन प्रस्ताव स्विकारण्याच्या संदर्भात अध्यक्षांना प्रश्न विचारता येत नाही. मल्लिकार्जुन खरगे

यांनी सदनाच्या मर्यादेचं उल्लंघन करत असून काँग्रेस राज्यसभा अध्यक्षांच्या पदाचा अपमान करत आहेत, असंही ते म्हणाले. अदानी लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीच्या मागणीसाठी आज संसद परिसरात विरोधी पक्षानं आंदोलन केलं. या आंदोलनात काँग्रेस, मार्क्सवादी आणि इतर विरोधी पक्षाचे खासदार सहभागी झाले होते.

-----------------------------------------------

कॅश लेस उपचार

रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या योजनेमुळे रस्ते अपघातातल्या जखमींना रुग्णालयात दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार कॅशलेस पद्धतीने मिळू शकतील, असं गडकरी यावेळी म्हणाले. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महाराष्ट्रातल्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर विविध सदस्यांनी प्रश्न विचारले.

-----------------------------------------------

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी काल देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरु झाली. आज सायंकाळी साडे ५ वाजता ही स्पर्धा संपली. आज या स्पर्धेचे विजेते घोषित करण्यात येणार आहेत. रात्री ८ वाजता देशातल्या सर्व नोडल सेंटरमध्ये विजेत्यांना पारितोषिके देण्यात येतील. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल दूरस्थ माध्यमातून या हॅकेथॉनचं उद्घाटन केलं होतं. तसंच, हॅकेथॉनमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी पंतप्रधानांनी काल दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला होता. या स्पर्धेत नागपूरच्या हिंगणा स्थित जी.एच.रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय देखील सहभागी झाले होते. केंद्रीय मंत्रालयाकडून चार समस्या निवारण करण्यासाठीचे प्रस्ताव इथे प्राप्त झाले असून त्यासाठी 9 राज्यांतून 120 स्पर्धकांनी यात सहभाग नोंदविला होता. याबाबत अधिक माहिती सांगत आहेत डॉ.दिनेश पडोळे...

*स्मार्ट इंडिया हाकथॉन कालपासून सुरु झालेले आहे. या ३६ तासाच्या आयोजनमध्ये २ मिनिस्ट्रीचे ४ वेगवेगळे प्रॉब्लेम दिलेले होते. या प्रत्येक प्रॉब्लेम स्टेटमेंटला ५ वेगवेगळ्या टीम ज्या पूर्ण भारता मधून आलेल्या होत्या. आज त्या प्रॉब्लेम स्टेटमेंटचे कंटिन्यू जजमेंट चालले आहे. ते प्रत्येक प्रॉब्लेम स्टेटमेंटसाठी एक एक टीम आज विनर घोषित होईल. त्यांना मिनिस्ट्री कडून १ लाखाचं पारितोषिक घोषित करण्यात येईल.*

-----------------------------------------------

पंचायत पुरस्कार

राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांचं काल नवी दिल्ली इथं राष्ट्रपातींच्या हस्ते वितरण झालं. यात महाराष्ट्राला ६ पुरस्कार प्राप्त झाले. गोंदिया जिल्हयातील तिरोडा पंचायत समितीला नानाजी देशमुख पंचायत पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे

*तिरोडा पंचायत समितिने देशात तिसरा तर राज्यात पहिला पुरस्कार मिळवला असून हा पुरस्कार तिरोडा पंचायत समितीच्या' सभापती कुंदा पटले आणि खंडविकास अधिकारी सतीश लिल्हारे यांनी स्वीकारली आहे. पंचायत विभागाच्या योजनांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी व PDI डाटा पूर्ण केल्याने देशातून गोंदिया जिल्हयातील तिरोडा पंचायत समितीचा तिसरा क्रमांक लागला असून १ कोटी ५ लक्षचा धनादेश मिळाला असून, या निधीतून तिरोडा पंचायत समितीच्या अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये विविध विकासक्रम केले जाणार आहे.*

भंडारा जिल्हयातील बेला ग्रामपंचायतीला कार्बन न्यूट्रल विशेष पुरस्कार देण्यात आला आहे. ऐकुया याबद्दलचा आमच्या प्रतिनिधीचा वृत्तांत...

*प्रदूषण नियंत्रण करायचे असेल तर झाडे लागवड आज काळाची गरज बनलेली आहे. बेला ग्रामपंचायत अंतर्गत गावात वैयक्तिक घरोघरी जवळपास ९० हजार झाडे लागवड करण्यात आली आहे. या माध्यमातून कार्बन न्यूट्रल होण्यास मदत होईल. या अनुषंगाने बेला ग्रामपंचायतची निवड करण्यात आलेली आहे. या पुरस्कारामुळे गावात उत्सहाचे वातावरण आहे. आणखी गावाच्या विकासाकरिता काय नवीन प्रयोग करता येईल याकडे ग्रामपंचायतचे विशेष लक्ष आहे.*

-----------------------------------------------

पीएम विश्वकर्मा

रेशीम बाग मैदान इथं दिनांक 14 ते 16 डिसेंबर दरम्यान पीएम विश्वकर्मा प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. पीएम विश्वकर्मा या केंद्रीय योजनेचा उद्देश कारागिरांना विश्वकर्मा म्हणून सक्षम करणे आणि मान्यता देण्याचा आहे जेणेकरून ते त्यांचे उद्योग स्थापन करून सक्षम होतील. 14 डिसेंबर रोजी सकाळी पावणे बारा वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन होणार आहे. विश्वकर्मा आणि सर्वसामान्य जनतेला या कार्यक्रमाचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी आणि पारंपारिक कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी या प्रदर्शनीला मोठ्या संख्येने भेट देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

-----------------------------------------------

बस बंद

परभणी इथ  डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतीचा एका जातीयवादी व्यक्तीन केलेल्या अवमाना प्रकरणी दिनांक 11 डिसेंबर रोजी परभणीत पुकारलेल्या बंदला हिंसक वळण लागलं. त्यातून सार्वजनिक मालमत्ता, एसटीच्या बसेस, तसेच इतर वाहनांची झालेली तोडफोड या पार्श्वभूमीवर आज सकाळ पासून वाशिम आगारातून हिंगोली, परभणी, नांदेड कडे जाणाऱ्या बसेस वाशिम आगारात थांबल्या तर उपरोक्त ठिकाणाहून येणाऱ्या बसेसही बंद आहेत. अकोल्यावरून मराठवाड्यात जाणाऱ्या बसेस वाशिम बस स्थानकावर उभ्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे वाशिम इथल्या बस स्थानकावर प्रवाशांची तारांबळ उडाली आहे. दरम्यान, परभणी इथ दिनांक 10 डिसेंबर रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ असलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्या समाजकंटकावर शासनाने देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी आज वाशिम इथल्या आंबेडकरी समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

-----------------------------------------------

भीमा कोरेगाव

१ जानेवारी २०२५ ला कोरेगाव भीमा शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभ इथं शेकडो अनुयायी अभिवादनासाठी येतात. या निमित्ताने पोलिस अधीक्षक देशमुख यांनी नुकतीच शिक्रापूर पोलिस ठाण्यासह परिसराची, पार्किंग व्यवस्थेची, बंदोबस्तासाठी येणाऱ्या राज्यभरातील पोलिस पथकांच्या व्यवस्थेची प्राथमिक माहिती घेतली. वाहनांच्या पार्किंगसाठी शिक्रापुरात १४ एकरांचे अतिरिक्त पार्किंग आणि सुमारे एक हजार अतिरिक्त पोलिस बळ वाढविले आहे. एकूण ७४ एकर क्षेत्र पार्किंगसाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती देशमुख यांनी दिली.

-----------------------------------------------

'अपार'

'एक देश एक विद्यार्थी ओळख' या संकल्पनेतून राबवण्यात येणाऱ्या 'अपार' अर्थात ऑटोमेटेड परमनंट अकॅडमी अकाउंट रजिस्ट्री नोंदणीत सिंधुदुर्ग जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर राहिला आहे.अहिल्यानगर जिल्हा दुसऱ्या स्थानावर तर रत्नागिरी जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याची ही नोंदणी ९०.८६ टक्के एवढी आहे. पहिला टप्प्यात विद्यार्थ्यांना बारा अंकी ओळख क्रमांक मिळाला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार देशाच्या एकूणच शैक्षणिक धोरणात अमुलाग्र बदल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यातीलच 'अपार' हा एक उपक्रम आहे. याद्वारे देशातल्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा स्वतंत्र ओळख क्रमांक आणि सोबतच

डिजिलॉकरची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यालाच ऑटोमेटेड परमनंट अकॅडमी अकाउंट रजिस्ट्री अर्थात अपार असं म्हणतात.

---------------------------------------------

क्षयरोग मुक्त मोहीम

क्षयरोग प्रसाराचे प्रमाण कमी करणे आणि मृत्युदर कमी करण्याच्या दृष्टीने भारत सरकार द्वारा सन २०२५ पर्यंत देश क्षयमुक्त करण्यासाठी दि. ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ पर्यत १०० दिवसीय क्षयरोग मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत निक्षय शिबिराद्वारे समाजातील अतिजोखमीच्या लोकसंख्येची तपासणी करण्यात येणार असुन त्यामध्ये २ आठ्वड्यापेक्षा जास्त दिवसाचा खोकला, वजन कमी होणे, छातीत दुखणे, संध्याकाळी येणारा हलका ताप, थुंकीवाटे रक्त पडणे, पुर्वी क्षयरोग झालेले क्षयरोग बाधित रुग्णाच्या सहवासीत, एचआयव्ही बाधित रुग्ण, कुपोषीत व्यक्ती, ६० वर्षावरील व्यक्ती, मधुमेह बाधित, धुम्रपान करणारे व्यक्ती यांची क्षयरोगाबाबतची तपासणी करण्यात येत आहे. या अंतर्गत आज गोंदिया जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र खमारी इथं शंभर दिवसीय टीबी मुक्त भारत कार्यक्रम अंतर्गत रुग्णशोध मोहिमेचे उद्घाटन संपन्न झाले.

---------------------------------------------

हवामान

विदर्भात थंडीचा जोर वाढला असून किमान तापमानात आज पुन्हा घट नोंदवण्यात आली. आज विदर्भात सर्वात कमी किमान तापमान नागपूर आणि गोंदिया इथं 9.8 अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. वर्धा इथं किमान तापमान 10.5 अंश, गडचिरोली इथं दहा पूर्णांक आठ अंश, तर चंद्रपूर इथं 11.8 अंश सेल्सिअस इतकं होतं. पश्चिम विदर्भात किमान तापमान 11 ते 13 अंश सेल्सिअस दरम्यान राहिलं. मागील 24 तासांत नागपुरात कमाल तापमान 28.4 अंश सेल्सिअस इतकं होतं. विदर्भात सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद वाशिम इथं 32.8 अंश सेल्सिअस इतकी झाली आहे.

******